# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 : स्वरूप, संधी आणि आव्हाने

**डॉ.बाबू दिगंबर तोटरे**
अर्थशास्त्र विभाग,
जे. ई. एस. महाविद्यालय, जालना

**कु. प्रतिभा राधाकिसन घुगे**
संशोधक विद्यार्थिनी
जे.ई.एस. महाविद्यालय, जालना

**सारांश :-**

मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा आणि शिक्षण या मूलभूत गरजा आहे. शिक्षण हा महत्त्वाच्या घटकांचा विचार करताना भारत सरकारने शैक्षणिक सत्र २०२२-२०२३ पासून 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' लागू केले आहे. 21 व्या शतकातील नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 अन्वये शैक्षणिक ढाच्यामध्ये, नियमामध्ये, प्रशासकीय व्यवस्था मध्ये अनेक सुधारणा व अमुलाग्र बदल नमूद करण्यात आले आहे. या शतकातील शाश्वत विकास ध्येय प्राप्त करणे शक्य होईल अशी समर्थ, सशक्त शैक्षणिक व्यवस्था उभारणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे.

नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून सर्जनशील विचार, चिकिस्तक विचार, संभाषण, कला, सहकार्य, सह वेदना आणि आत्मविश्वास या कौशल्यावर विशेषत्वाने लक्ष दिले जाणार आहे. शिक्षण अभ्यासक्रमांना वेगवेगळ्या शाखांच्या चौकटीतून बाहेर काढून आंतरशाखीय आणि समन्वयी करण्यात आले आहे. NEP 2020 चा उद्देश अष्टपैलू व्यक्तिमत्व निर्माण करणे हे असणार आहे. 21 व्या शतकात वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी डिजिटल वाचनालय स्थापन करण्यात येत आहे. उच्च शिक्षणात महत्त्वपूर्ण बदल करून संशोधनाला चालना देण्यासाठी 'नॅशनल रिसर्च फाउंडेशन' स्थापना करण्यात आली तसेच प्रत्येकाला शिक्षण घेण्याच्या उद्देशाने 'अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट' ही योजना राबवली जाणार आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या सोयीनुसार व वेळेनुसार शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होईल.

**प्रस्तावना :-**

अन्न, वस्त्र, निवारा आणि शिक्षण या माणसाच्या 21व्या शतकातील मूलभूत गरजा आहे. त्यातील शिक्षण ही अशी गरज आहे की जी गरज भागवल्यानंतर माणसाला अन्न, वस्त्र आणि निवारा या गरजांसाठी कोणावर अवलंबून राहावे लागत नाही. फक्त शिक्षण त्या दमाच्या असायला हवे. ते म्हणतात ना, शिक्षण म्हणजे वाघिणीचे दूध जो घेतो तो डरकाळी फोडतोच. शिक्षण हे योग्य दमाचे नाही मिळाले किंवा अद्यावत शिक्षण नाही मिळाले तर त्या शिक्षणाचा फायदा तरी काय? म्हणून शिक्षण प्रक्रियेत सतत योग्य ते बदल घडवून येणे आवश्यक असते. शिक्षण ही अखंडपणे बदलत जाणारी एक प्रक्रिया आहे.

अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या अनेक गरजा कालानुरूप बदलत असतात. या गरजा भागवण्यासाठी प्रत्येक नागरिकाला सक्षम होणे गरजेचे असते. यासाठी शिक्षण योग्य पातळीचे मिळायला हवे, म्हणूनच भारताच्या स्वातंत्र्यानंतर नागरिकांच्या निरक्षरतेची समस्या दूर करण्यासाठी भारत सरकारने विविध कार्यक्रम आखले. त्यामध्ये भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांनी देशभरासाठी 'समान शैक्षणिक पद्धत' आणून विविध शिक्षण आयोग (डॉ. राधाकृष्ण आयोग) मुदलियार आयोग आणि कोठारी आयोग प्रस्तावित केले. भारतीय स्वातंत्र्यानंतर पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1968 मध्ये ठरवण्यात आले. त्यानंतर दुसरे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 मध्ये लागू करण्यात आले. 1992 मध्ये या धोरणात काही प्रमाणात बदल करण्यात आला. 2009 मध्ये मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार RTE Act 2009 संमत केला गेला. या कायद्याने प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षणाचा अधिकार मिळाला. त्यानंतर 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' निश्चित करण्यासाठी अभ्यास गट स्थापन करण्यात आला.

सर्वप्रथम 31 ऑक्टोबर 2015 मध्ये टी. एस. आर. सुब्रमण्यम पाच सदस्य समिती गठित करण्यात आली होती. एस. आर. सुब्रमण्यम हे माजी कॅबिनेट सचिव होते. यांच्या अध्यक्षतेखाली 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' निश्चित करण्यासंदर्भात समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने 27 मे 2016 रोजी आपला अहवाल सादर केला. त्यानंतर 24 जून 2017 मध्ये डॉ. के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली नऊ सदस्य समिती स्थापन करण्यात आली. डॉ. कस्तुरी रंगन हे इस्रोचे प्रमुख शास्त्रज्ञ आहे. 'नवीन शैक्षणिक धोरणाचा मसुदा' बनवण्याचे काम या समितीकडे होते. मानव संसाधन मंत्रालयाला मे 2019 मध्ये अहवाल सादर केला गेला. 31 मे 2019 मध्ये रमेश पोखरीयाल आयोग नेमण्यात आला होता. त्यावेळी पोखरीयाल हे मानव संसाधन मंत्री होते. हा अहवाल त्यांनी अभ्यासून लोकांची मते मागवली.

तब्बल 34 वर्षानंतर 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' 29 जुलै 2020 रोजी मंजूर करण्यात आले. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये जागतिक विकास कृती कार्यक्रम समाविष्ट असून "सर्वांसाठी समावेशक आणि समान गुणवत्तेचे शिक्षण आणि सर्वांसाठी निरंतर अध्ययनाच्या शिक्षणाच्या संधींना प्रोत्साहन देण्याचे 2030 पर्यंत उद्दिष्ट पूर्ण करण्याविषयी आहे".

**शालेय शिक्षणाचे स्वरूप :-**

शालेय शिक्षणाच्या सध्याच्या १०+२ या संरचनेत बदल करून ३ ते १८ वयोगटाला समाविष्ट करणारी ५+३+३+४ अशी अध्यापन व अभ्यासक्रमाची रचना केली आहे. 21 व्या शतकासाठी आवश्यक्य कौशल्य प्रधान करण्याला महत्त्व देण्यात आले आहे. या धोरणातील तरतुदीनुसार ३ ते १४ वर्ष वयोगटाचे विद्यार्थी शिक्षण हक्क कायद्याच्या कक्षेत आले आहे.

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69 ISSN No. 2456-1665

- **पायाभूत स्तर ५ वर्ष (३-८):-**

३ वर्ष (अंगणवाडी/पूर्व प्राथमिक शाळा/बालवाडी) बालकाचे वय तीन ते सहा वर्ष , २ वर्ष (इयत्ता १ आणि २), वय सहा ते आठ. हा टप्पा संज्ञानात्मक, सामाजिक, भावनिक आणि सर्जनशील कौशल्य विकसित करण्यावर लक्ष केंद्रित करून खेळ आधारित आणि क्रियाकलाप आधारित शिक्षणावर लक्ष केंद्रित करेल.

- **पूर्वा अध्ययन स्तर ३ वर्ष (वय ८ ते ११ ) :-**

(इयत्ता ३ ते ५) हा टप्पा प्रकल्प आधारित आणि अनुभवात्मक शिक्षणावर लक्ष केंद्रित करेल, ज्यामध्ये गंभीर विचार, समस्या सोडवणे आणि संवाद कौशल्य विकसित करण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल.

- **पूर्व माध्यमिक स्तर ३ वर्ष (वय ११ ते १४):-**

(इयत्ता ६ ते ८) हा टप्पा विषय आधारित शिक्षणावर लक्ष केंद्रित करेल ज्यामध्ये संकल्पनात्मक समज आणि विश्लेषणात्मक कौशल्य विकसित करण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल.

- **माध्यमिक स्तर ४ वर्ष :- (वय १४ ते १८):-**

(इयत्ता ९ ते १२) हा टप्पा बहुविद्याशाखीय अभ्यासावर केंद्रित असेल ज्यामध्ये व्यावसायिक आणि शैक्षणिक दोन्ही कौशल्य विकसित करण्यावर भर असेल.

या नवीन धोरणाचे उद्दिष्ट प्री-स्कूल ते माध्यमिक स्तरापर्यंतच्या शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्याचे आहे. शालेय शिक्षणात 100% जीआरईसह ते करण्याची योजना आहे. 2030 पर्यंत देशात साध्य करण्याची योजना आहे. सर्वप्रथम धोरणात परदेशी विद्यापीठांमध्ये भारतीय उच्च शिक्षण सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. विविध निर्गमन पर्यायासह चार वर्षांचा बहुविद्याशाखीय अंडरग्रॅज्युएट प्रोग्राम सादर करण्याचे उद्दिष्ट आहे. अशाप्रकारे हे नवीन धोरण भारत देशाला जागतिक ज्ञान महासत्ता बनवण्याचा प्रयत्न करत आहे. त्याचप्रमाणे 2040 पर्यंत सर्व विद्यापीठे आणि महाविद्यालय बहुविद्याशाखीय बनवण्याचे उद्दिष्ट आहे. शेवटी धोरणाचे उद्दिष्ट भारतातील रोजगार वाढवणे आणि सध्याच्या शैक्षणिक व्यवस्थेत मूलभूत बदल घडवून आणणे हे आहे.

पहिल्या टप्प्यात जे पाच वर्ग आहे यात पहिली तीन वर्षे बाल शिक्षण आणि पहिली व दुसरीचे वर्ग म्हणजे पूर्व प्राथमिक. पुढच्या टप्प्यात तिसरी चौथी आणि पाचवी हे तीन वर्ग प्राथमिक शिक्षणाचे असतील. सहावी सातवी आणि आठवी हे तीन वर्ग तिसरा टप्प्यात असतील ज्याला पूर्व माध्यमिक, आणि शेवटच्या टप्प्यात म्हणजे चौथ्या टप्प्यात चार वर्ग असतील ते नववी ते बारावी. देशात पाच कोटी मुले शिक्षणाच्या प्रवाहात सहभागी आहेत. मात्र, त्या मुलांना भाषिक व गणितीय साक्षरतेचा टप्पा पार करता आलेला नाही. पायाभूत साक्षरतेचा टप्पाच पार करताना आल्यास विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहापासून तुटतो. क्षमता आणि आकलनाची शक्यता अजिबात नसते. जे शिकलो तेच जर कळत नसेल तर पुढील शिक्षणात सहभागी होणे घडत नाही, त्यामुळे धोरणात या स्तरावरती बदल करताना पायाभूत व अंकीय साक्षरतेचा विचार खूपच महत्त्वाचा आहे. पहिल्या तीन वर्षात शिक्षणाच्या दृष्टीने पूर्वतयारी होण्याची शक्यता आहे, या

स्तरावरती शिक्षणाची प्रक्रिया सुरू झाली तर गुणवत्तेच्या आलेखात बदल होण्याची शक्यता अधिक आहे सध्याच्या प्राथमिक शिक्षणाचा आरंभ पहिलीपासून सुरू होतो. या स्तरावर शरीराची, स्नायूची, मनाची तयारी केली जाणार आहे. अभ्यासक्रम आराखडा केंद्राने दिला आहे पण राज्याने त्यासाठी टाकलेली पावले कौतुकास्पद आहेत.

**नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील संधी:-**

नवीन युगातील नवीन पिढीच्या शैक्षणिक गरजा संरचनात्मक समानता आणि विद्यार्थ्यांना भविष्यासाठी तयार करण्यामध्ये येणाऱ्या समस्याचे निराकरण हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. यासोबतच शिक्षण व्यवस्थातील अनेक संकटांना तोड देण्याचे सर्वात आव्हानात्मक कार्य ही या धोरणाद्वारे पुरे करण्याचे आहे. आत्मिक शिक्षण हे मातृभाषेतच दिले पाहिजे असे नवीन शैक्षणिक धोरणात स्पष्ट दिशा दिली आहे. आज संपूर्ण देशभरात फार मोठ्या संख्येने इंग्लिश माध्यमाच्या पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळा अस्तित्वात आहे. निश्चितच इंग्लिश ही या सर्व मुलांची मातृभाषा नाही. त्यामुळे या शाळांचे भवितव्य काय असेल? आज मराठी शाळेत शिकणाऱ्या एखाद्या मुलांचे मातृभाषा कन्नड, गुजराती, तामिळ असेल तर त्यांच्या शिक्षणाची पर्यायी व्यवस्था काय करता येईल? यासाठी या शैक्षणिक धोरणात मातृभाषेतून शिक्षण देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

- **विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास :-**
  नवीन शैक्षणिक धोरण हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देते ज्यामध्ये संज्ञानात्मक, सामाजिक, भावनिक आणि शारीरिक विकासाचा समावेश होतो
- **अभ्यासक्रम लवचिकता :-**
  नवीन शैक्षणिक धोरणामध्ये अभ्यासक्रम हा लवचिक तयार करण्यात आलेला आहे ज्यामध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार विषय निवडण्याची संधी मिळाली आहे. हे वैयक्तिकृत शिक्षणाला प्रोत्साहन देते विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचा शोध घेण्यास आणि त्यांच्या निवडलेल्या क्षेत्रात कौशल्य विकसित करण्यास सक्षम करते.
- **सर्वसामावेशक शिक्षण :-**
  हे धोरण सर्वसामावेशक शिक्षणाला प्राधान्य देते, अपंग आणि उपेक्षित समुदायासह विविध पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांना समान संधी सुनिश्चित करते. हे सर्व समावेशक आणि आश्वासक शिक्षण वातावरणाला प्रोत्साहन देते, विद्यार्थ्यांमध्ये सहानुभूती आणि समजूतदारपणा वाढवते.
- **कौशल्य विकास:-**
  राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 हे कौशल्य विकासावर भर देते विद्यार्थ्यांना क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन, समस्या सोडवणे आणि डिजिटल साक्षरता यासारख्या 21 व्या शतकातील

कौशल्य सुसज्ज करते. हे त्यांची रोजगार क्षमता वाढवते आणि भविष्यातील आव्हानासाठी त्यांना तयार करते.

- **कमी केलेला अभ्यासक्रम ओझे:-**
  राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मूळ संकल्पना आणि अत्यावश्यक शिक्षण परिणामावर भर देऊन विद्यार्थ्यांवरील अभ्यासक्रमावरील ओझे कमी करणे हे आहे. हे विषयांचे सखोल आकलन करण्यास अनुमती देते आणि अधिक व्यापक शिक्षण अनुभवास प्रोत्साहन देते.
- **बहुविद्याशाखीय शिक्षणास प्रोत्साहन:**
  राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार विद्यार्थी विविध विषयात विविध क्षेत्रांमध्ये आपले शिक्षण पूर्ण करू शकणार आहेत.
- **परीक्षा पद्धतीत बदल:-**
  निरंतर मूल्यमापन शिक्षण पद्धती बदलून वस्तूनिष्ठ तिकडे लक्ष दिले जाणार आहे. तिसरी चौथी आठवी व बारावी या चार स्तरावरच्या परीक्षा पद्धती तपासताना विद्यार्थ्यांच्या उत्तर पत्रिकेत शिक्षकच न तपासता विद्यार्थी पालक सहकारी आणि विद्यार्थ्यांचा अभिप्राय यांचा एकत्रित मूल्यमापन करून अंतिम मूल्यमापन करतील.
- **त्रिभाषीयता :-**
  मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण देण्यावर भर देण्यात आलेला आहे, तसेच भाषांच्या शिक्षणासाठी मातृभाषा, इंग्रजी आणि प्रादेशिक भाषा अशी त्रिभाषीय शिक्षण प्रणाली तयार करण्यात आलेली आहे.
- **तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण:-**
  तंत्रज्ञानात होणाऱ्या बदलाची क्षमता ओळखून अध्यापन आणि शिक्षणावर भर देण्यात येणार आहे तसेच शैक्षणिक प्रशासनामध्ये देखील तंत्रज्ञानाच्या वापराचे समर्थन केलेले आहे.
- **संशोधन आणि नवीन उपक्रम:-**
  उच्च शिक्षणात महत्त्वपूर्ण बदल करून संशोधनाला चालना देण्यासाठी 'नॅशनल रिसर्च फाउंडेशन' स्थापना केली जाणार आहे. याद्वारे विद्यार्थ्याला संशोधनामध्ये महत्त्वपूर्ण मदत मिळणार आहे. ज्ञान निर्मिती आणि संशोधन या गोष्टी समाजाच्या उत्थानासाठी आणि देशाच्या विकासासाठी अतिशय महत्त्वाच्या आहेत. सध्या जगात घडणाऱ्या या बदलाकडे पाहता संशोधनाची एक मजबूत परिसंस्था महत्त्वाची झालेली आहे. देशातील विद्यार्थ्यांना संशोधनाची संधी उपलब्ध व्हावी, संशोधनात अर्थसहाय्य करण्यासाठी आणि विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये सक्रियपणे संशोधन योजनेसाठी 'नॅशनल रिसर्च फाउंडेशन' ची स्थापना केली आहे. या फाउंडेशन अंतर्गत पुढील पाच वर्षात 50000 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

- **अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट:-**
  माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवीन शैक्षणिक धोरणाच्या एक वर्ष पूर्ण होण्याच्या पार्श्वभूमीवर विविध नवीन पूर्ण योजना ची घोषणा केली. त्यातीलच एक योजना म्हणजे अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट होय. प्रत्येकाला शिक्षण घेता यावे, या उद्देशाने देशात अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट ही योजना राबवली जाणार आहे. या योजनेमुळे विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार व उपलब्ध वेळेनुसार शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होईल.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आव्हाने:-**

एकाच वेळी इतक्या मोठ्या व्यवस्थेला गतिमान करणे आणि त्यांच्यापर्यंत हे सारे बदल पोहोचणे मोठे आव्हानच असणार आहे. देशातील उच्च शिक्षण, उच्च शिक्षणाला अधिक प्रगतिशील बनवण्यासाठी, विज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित बरोबरच विद्यार्थ्यांची समस्या सोडवण्याची सर्जनशीलता सुधारण्यासाठी कला आणि डिझाईन विचारांची आवश्यकता आहे. शिक्षण हे अनुभवात्मक, अनुप्रयोग, संशोधन आधारित आंतरवासिका देखील असणार आहे. मात्र उच्च शिक्षण 70 टक्के खाजगी व्यवस्थापनाच्या हाती आहे त्यांना यात सहभागी करून घेताना त्यांना गतिमान करणे आवश्यक आहे. मोठ्या प्रमाणावर बदल सुचवले आहे, शिक्षणा चे डिजिलायझेशन सुचवले आहे विविध संस्थांची नव्याने निर्मिती अपेक्षित आहे शिक्षकांचे सातत्यपूर्ण प्रशिक्षण आहे हे सारे बदल करण्यासाठी राज्य व केंद्र सरकारने आर्थिक गुंतवणूक करण्याचे मोठे आव्हानच आहे.

देशात 1965 ला कोठारी आयोगाने राष्ट्रीय उत्पन्नाच्या सहा टक्के खर्च शिक्षणावर करावा असे म्हटले होते, मात्र अद्याप ते यश मिळू शकले नाही आज आपण शिक्षणावर खर्च केवळ तीन टक्के करत आहोत त्यामुळे गुंतवणूक वाढवल्याशिवाय आपल्याला धोरणाच्या अंमलबजावणीला पुरेसे यश मिळण्याची शक्यता नाही. शिक्षणात ऑनलाईन वर भर देण्यात आला आहे. मात्र, आजही राज्यातील वनवासी, ग्रामीण, दुर्गम भागात इंटरनेट सुविधा नाही. ई-लर्निंग हाच पुढे जाण्याचा मार्ग आहे. डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये डिजिटल क्लासरूम, कौशल्य, ऑनलाइन अध्यापन मॉडेल, शारीरिक शिक्षण आणि प्रयोगशाळेच्या पायाभूत सुविधा मधील तफावत दूर करण्यासाठी तंत्रज्ञान, शाळांमध्ये एक समान मूल्यांकन योजना, व्यवसाय मार्गदर्शन, समुपदेशन, शिक्षक प्रशिक्षण यांचा समावेश असणार आहे. त्यामुळे या सुविधा सर्व शाळांमध्ये उपलब्ध करून देणे आव्हान ठरणार आहे. नवे बदल स्वीकारण्यासाठी माणसे आणि पैसा या गोष्टी महत्त्वाच्या असल्या तरी त्याकरता मनुष्यबळ, पालक, शिक्षक, विद्यार्थी या सर्वांच्या मानसिकतेत बदल घडून आणावा लागणार आहे. धोरणांच्या अनुषंगाने काय विचार करायचा यापासून कसा विचार करायचा असे परिवर्तन आवश्यक आहे. मात्र आव्हाने खूप असली

तरी राजकीय इच्छाशक्ती असेल तर धोरणाची अंमलबजावणी कठीण नाही. विद्यमान शिक्षण पद्धतीमध्ये महाविद्यालयीन आणि विद्यापीठातील शिक्षकांसाठी अध्यापन शास्त्राकडे औपचारिक प्रशिक्षण आणि अभिमुखता वगळण्यात आली आहे. यामुळे शिक्षणाच्या विविध स्तरावर पायाभूत, उच्च श्रेणी विचार, कौशल्य प्रबोधन सक्षम करण्यासाठी ते लवचिक व सेंद्रिय बनवण्यासाठी अभ्यासक्रमाच्या रचनेत तातडीने फेरबदल करण्याची आवश्यकता आहे. उच्च शिक्षणासाठी एकल अनुशासनात्मक संस्थाच्या जागी बहुशासनात्मक संस्था स्थापन करण्याचा धोरणाचा प्रयत्न आहे चांगल्या हेतूने हे ध्येय गाठण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

**संदर्भसूची :**

1) हिरा आहेर (२०१०), भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक, नागपूर: डॉट सन पब्लिकेशन
2) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार, (मराठी आवृत्ती)
3) जनार्धन वाघमारे,'बदलते शिक्षण: स्वरूप आणि समस्या'पद्मगंधा प्रकाशन, पुणे
4) दैनिक लोकमत (पुणे आवृत्ती) 29 नोव्हेंबर 2021
5) https://www. education. gov.in/sites/upload _files/mhrd/files/NEP/Marathi 1.pdf